# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/६१३२/२०१७ दिनांक १३/११/२०१७

# अधिसूचना

सर्वसामान्यांच्या माहितीसाठी अधिसूचीत करण्यात येत आहे की, दिनांक १५/०७/२०१७ रोजी शारिरीक शिक्षण तसेच ग्रंथालय व माहिती तंत्रज्ञान शास्त्र अभ्यासमंडळ गठीत केले जाण्यासाठी महाविद्यालयाकडून नावे मागविण्यात आली होती. महाविद्यालयांकडून आलेली नावे विचारात घेवून शारिरीक शिक्षण तसेच ग्रंथालय व माहिती तंत्रज्ञानशास्त्र अभ्यासमंडळ गठीत केले जाण्यासाठी दिनांक २६.१०.२०१७ रोजी मतदार यादी प्रकाशित करण्यात आली होती. शारिरीक शिक्षण मतदार यादीमध्ये ४४ मतदारांचा तसेच ग्रंथालय व माहिती तंत्रज्ञानशास्त्र मतदार यादीमध्ये ४५ मतदारांचा समावेश करण्यात आला होता.

विद्यापीठाद्वारे निर्गमित करण्यात आलेल्या निदेश क्रमांक ९(जी)/२०१७ मधील परिच्छेद ३ च्या उपपरिच्छेद (क) मध्ये "विभागाची" जी व्याख्या पुरविण्यात आली आहे त्या व्याख्येच्या अनुषंगाने संबंधीत मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नोंद असलेला कोणताही शिक्षक शारिरीक शिक्षण तसेच ग्रंथालय व माहिती तंत्रज्ञानशास्त्र ही दोन अभ्यास मंडळ गठित केल्या जाण्यासाठी पात्र नसल्यामुळे संबंधीत मतदार यादी रद्द करण्यात येत आहे. तसेच याच मतदार यादीच्या आधारावर जे उमेदवारी अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाले आहेत त्या अर्जाची छानणी करण्यात येणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

दिनांक : १३/११/२०१७
स्थळ :– गडचिरोली.

(दिपक जुनघरे)
कुलसचिव तथा
निवडणूक निर्वाचन अधिकारी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रतिलिपी माहिती व योग्य कार्यवाहीस्तव सादर :**

१) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र–कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालयांचे अध्यापक, पदव्युत्तर अध्यापक, मान्यताप्राप्त संस्थेचे संचालक आणि अध्यापक.
४) सर्व संलग्नीत महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे व्यवस्थापन प्रतिनिधी.
५) विद्यापीठाचे सर्व अध्यापक
६) विद्यापीठाचे सर्व अधिकारी